प्रतिसाठी अर्ज आल्याची तारीख 25/10/2023
फी भरल्याची तारीख 26/10/2023
नक्कल तयार झालेची तारीख
नक्कल देणेचे आल्याची तारीख

अधिक्षक 26/10/2023
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2022 ◑ BN 982520

दिनांक 02/08/2022 वि.नं. 3968 स्टॅम्प किंमत रुपये ५००/-
श्री चंदीराम कवडोमल दरडा रा. गांधीनगर ता. करवीर स्वतः
किंमत रु ५००/- ) या स्टॅम्प करिता ५००/-
एकूण भरती रु ५००/- असे स्टॅम्प दिले.

राजकुमार श्रीचंद हिंदूजा
परवाना क्र. २२/२००१
कोड नं. २६०१०६६
गांधीनगर जि. कोल्हापूर
ट्रस्ट रजिस्ट्रेशन साठी

- 8 AUG 2022
STAMP HEAD CLERK,
TREASURY OFFICE,
KOLHAPUR. (M.S.)

TREASURY OFFICE KOLHAPUR

ASSISTANT CHARITY COMMISSIONER
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
KOLHAPUR REGION, KOLHAPUR

सहाय्यक धर्मादाय आयुक्त (एक)
कोल्हापूर विभाग कोल्हापूर.

## ट्रस्ट डिड (विश्वस्त व्यवस्था पत्र)

१) मी खाली सही करणार - श्री.चंदीराम कवडोमल दरडा
वय ५४ वर्षे, व्यवसाय - व्यापार,
रा.१२०२, गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर

आज दि.०२/०९/२०२२ इ. रोजी कोल्हापूर येथे सदरहु ट्रस्ट डिड करीत आहे.सदरहु विश्वस्त व्यवस्था पत्र (ट्रस्ट डिड)

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

१. श्री.चंदीराम कवडोमल दरडा
वय ५४ वर्षे,व्यवसाय - व्यापार,
रा.१२०२, गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर

यांच्यात की ज्यांचा उल्लेख या विश्वस्त व्यवस्था पत्रामध्ये (ट्रस्ट डिड) सेटलॉर म्हणून करण्यात आला आहे.

हे विश्वस्त व्यवस्थापत्र सेटलॉर यांचेमध्ये

...एक भाग

//आणि//

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.चंदीराम कवडोमल दरडा<br>वय ५४ वर्षे,व्यवसाय - व्यापार,<br>रा.१२०२, गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर | अध्यक्ष/सेटलॉर |
| २. | श्री.बक्षाराम कवडामल दर्डा<br>वय ५७ वर्षे,व्यवसाय- व्यापार<br>रा.सी एस नं.४१३, रेलवे स्टेशन रोड,<br>गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर | उपाध्यक्ष |
| ३. | श्री.संतोष बक्षाराम दर्डा<br>वय ३६ वर्षे,व्यवसाय- व्यापार<br>रा.सी एस नं.४१३, रेलवे स्टेशन रोड,<br>गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर | सेक्रेटरी |
| ४. | श्री.साहिल चंदीराम दरडा<br>वय ३२ वर्षे,व्यवसाय- व्यापार,<br>रा.१२०२, गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर | खजानिस |
| ५. | सौ.आशा चंदीराम दरडा<br>वय ५५ वर्षे, व्यवसाय- व्यापार,<br>रा.१२०२, गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर | विश्वस्त |

यांचेमध्ये की ज्यांचा उल्लेख यापुढे सामुदायिक रित्या विश्वस्त मंडळ म्हणून करण्यात आला आहे तो

...दुसरा भाग

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

यांचेमध्ये सदरचे विश्वस्त व्यवस्था पत्र(ट्रस्ट डिड) आज दि.०२/०९/२०२२ इ. रोजी कोल्हापूर येथे लिहिण्यात आले आहे.

प्रस्ताविक :-

ज्याअर्थी १) श्री.चंदीराम कवडोमल दरडा, वय ५४ वर्षे,व्यवसाय - व्यापार, रा.१२०२, गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर यांनी जनतेच्या हितासाठी, त्यांच्या व कुटूंबियांच्या वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक व शती विषसक प्रगतीसाठी एक धर्मादाय न्यास स्थापन करणेची इच्छा व्यक्त केलेली आहे. आणि सदरचा न्यास स्थापन करणेसाठी आपल्या स्वकष्टार्जित मिळकतीपैकी रक्कम रू.१०००/- (अक्षरी रूपये एक हजार फक्त) ही रक्कम परत न घेण्याच्या अटीवर न्यासाचे नावे कायम स्वरूपी ते ठेवू इच्छितात आणि सदरची रक्कम हे विश्वस्त व्यवस्था पत्र(ट्रस्ट डिड) अमलांत येणेपूर्वीच त्यांनी विश्वस्त मंडळाडे सुपूर्द केलेली आहे आणि त्या रक्कमेवरील स्वत:ची मालकी व ताबा संपुष्टात आणलेला आहे.

त्याअर्थी ते सदरहु न्यासाचे सटलॉर यांच्या इच्छापूर्तीसाठी सदर न्सास निधीची रक्कम रू.१०००/- (अक्षरी रूपये एक हजार फक्त) चा स्विकार केलेला असून सेटलॉर यांच्यावरील इच्छांची उद्देशपुर्ती करणेचे ठरविले आहे.

त्याअर्थी वर नमुद केले प्रमाणे इसम हे न्यासाचे प्रथम विश्वस्त बनतात.

त्याअर्थी "दरबार बाबा नानक चॅरिटेबल ट्रस्ट, गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर" हा न्यास (ट्रस्ट) दि.०२/०९/२०२२ इ. रोजी अस्तित्वात आला असे घोषित करण्यांत येत आहे.

ज्याअर्थी सेटलॉर वविश्वस्त मंडळ हे पुढील काळात सदरहु न्यासाची व्याप्ती वेळोवेळी देणगी,वर्गणी,अनुदान,बक्षिसपत्र अगर अन्य जिंदगीच्या रूपाने वाढवू इच्छितात.

त्याअर्थी खालील नमूद केलेप्रमाणे सदरहु न्यास (ट्रस्ट) स्थापन करण्यासाठी सदरच्या विश्वस्त व्यवस्था पत्राचे (ट्रस्ट डिडचे)लिखाण करण्यात येत आहे.

**१. न्यासाचे नांव –**

या न्यासाचे (ट्रस्टचे) नांव **"दरबार बाबा नानक चॅरिटेबल ट्रस्ट, गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर"** असे राहील.

**२. न्यासाचे कार्यालय –**

या न्यासाचे कार्यालय सध्या - व्दारा सौ.आशा चंदीराम दरडा, स.नं.४१७११/२/२६, गडमुडशिगी, गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर येथे

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

राहील.विश्वस्त मंडळास त्यांच्या सोईनुसार न्यासाचे कार्यालय अन्यत्र हलविता येईल. परंतु बदलेला पत्ता मे.धर्मादाय उप आयुक्त,कोल्हापूर यांचेकडे कळविणेस बंधनकारक राहील.

३. न्यासाचे कार्यक्षेत्र –

या न्यासाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य असे राहील.

४. न्यासाचे उद्देश –

१. शैक्षणिक –

१. सामाजिक प्रबोधन आणि सामाजिक बांधिलकी हे दोन उदात्त हेतू सामोरे ठेवून समाजसेवा,विधायक उपक्रम आणि राष्ट्रसेवा यासाठी प्रेरित होवून कार्य करणे.

२. थोर विचारवंत,बुद्धिवंत,वैज्ञानिक आणि कलाकार यांना प्रोत्साहन म्हणून कार्यक्रम घेणे,व्याख्याने, शिबीरे,चर्चासत्रे,परिसवांदआयोजित करणे. विविध सांस्कृतिक उपक्रम राबवून समाज प्रबोधनाच्या दृष्टिकोनातून सांस्कृतिक चळवळीचे संवर्धन करणे.

३. संस्थेतर्फे बालवाडी पुर्व-प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च महाविद्यालयीन आदि शिक्षणाची सोय करणे. निवासी व आश्रम शाळा चालू करणे. सर्व शैक्षणिक विषयातील दूरशिक्षण, बहिस्थशिक्षण, पदव्युत्तर, पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालू करणे. व त्यामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी माध्यमाला प्राधान्य देणे, तसेच निवासी शाळा चालू करणे.

४. संस्थेतर्फे सुरू करणेत येणा-या शिक्षणामध्ये शास्त्र, तांत्रिक, सैनिकी, कृषि, वैद्यकिय, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, व्यावसायिक, विधी, कला, अध्यापन,अध्यापक व हॉटेल मॅनेजमेंट इ. शिक्षणाला विशेष प्राधान्य देणे.

५. संस्थेतर्फे अंध, अपंग, अस्थिव्यंग, मतिमंद, कर्ण-मुकबधिर शाळा चालविणे आणि अपंगाच्या विकास कामी मदत करणे व त्यांचेसाठी निवासी शाळा चालु करणे.

६. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीर आयोजित करून ग्रामीण भागातील तरूणांना स्पर्धा परीक्षेसाठी उद्युक्त करणे.

७. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी निवासी शाळा व आश्रम शाळा,साखर शाळा व आश्रमाची स्थापन करणे व चालविणे,बालमजुरांसाठो पुनर्वसन केंद्राची स्थापन करणे,त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करणे,विद्यार्थ्यांसाठी व श्रमिक महिला,विद्यार्थीनीं यांचेसाठी वसतीगृहे, बोर्डींग स्थापन करणे.

८. वैद्यकीय व पॅरामेडिकल उदा. क्ष-किरण,तंत्रज्ञ, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, नेत्रोपचार तंत्रज्ञ संबधीत आभ्यासक्रम चालू करणे.

COMMISSIONER आयुक्त KOLHAPUR

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

२. वैद्यकिय –

१. मागासवर्गीय तसेच गरीब, वंचित लोकांकरिता वैद्यकिय सेवा व सुविधा माफक दरामध्ये उपलब्ध करून देणे. तसेच अपघात,आपत्काल,आजार अशा प्रसंगी रूग्णवाहीका उपलब्ध करून देवून त्या माध्यमातून गोरगरीब लोकांची सेवा करणे.

२. पंचकर्म केंद्र,आयुर्वेदिक वनस्पती लागवड तसेच योगा, ध्यान, नॅचरोपॅथी, युनानी, सिध्दा व होमिऑपिथी, ॲलापॅथी इ. सेंटरची स्थापन करणे.

३. सार्वजनिक आरोग्य दारु बंदी, कुटूंब नियोजन, अंधश्रध्दा या बाबतीत शासनाच्या व इतर समाजसेवी संस्थांच्या कार्यक्रमांना हातभार लावणे या भागात वेळोवेळी शिबीरे आयोजित करणे. तसेच कॅन्सर व हृदय विकाराचे निदान व उपचार केंद्र चालु करणे.

४. ग्रामीण व शहरी भागांमध्ये एड्स व कॅन्सर कंट्रोल केंद्र, व्यसनमुक्ती केंद्र, शिबीर व जनजागरण, उपचार पुनर्वसन व संशोधन व कौन्सलिंग केंद्र स्थापन करणे.

५. ब्लड बॅक, रक्तदान शिबीर, मेडिकल निदान सेंटर, मल्टि स्पेशालीटी हॉस्पिटल, पॉलिक्लिनिक, फिरता दवाखाना, रूग्णवाहिका शहरी व ग्रामीण भागात सुरू करणे.

६. माता व बालसंगोपन कार्यक्रम, आरोग्य शिक्षण तसेच आरोग्य विषयक वेगवेगळ्या विषयांवरील परिसंवाद आयोजित करणे.

७. ट्रस्टतर्फे लोकांना आरोग्याचे महत्व समजावे तसेच त्यांना सदृढ जिवन जगण्यासाठी योगासनाचे महत्व पटवून सांगणे. व त्यांना संस्थेमार्फत योगासनाचे प्रशिक्षण देणे. ट्रस्टतर्फे विद्यार्थीव विद्यार्थीनींचा बुध्यांक वाढावा यासाठी आत्मचिंतन, ध्यानसाधना, मन एकाग्रता करण्याच्या दृष्टीने त्यांना प्रशिक्षण देणे व मार्गदर्शन करणे.

८. ट्रस्टतर्फे रूग्णांना योगासने व त्यांचे रोगांवर निरनिराळे होणारे फायदे यांचे प्रशिक्षण देणे व मार्गदर्शन करणे.

३. पर्यावरण –

१. पर्यावरण रक्षण व संवर्धनाबाबत व्याख्याने व चर्चासत्रे आयोजित करून मार्गदर्शन करणे.

२. वृक्ष लागवडीचा तसेच पाणथळ जमीनीच्या संरक्षणाचा कार्यक्रम राबविणे.

३. पवन व सौर उर्जेचे महत्व ग्रामीण भागातील शेतक–यांना पटवून सांगणे व मार्गदर्शन करणे.

४. ट्रस्टतर्फे शेतीमध्ये संशोधन करणे त्यासाठी प्रगत शेतीचा अवलंब करणे, त्याचा प्रचार व प्रसार करणे.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

४. सामाजिक

१. वृद्ध लोकांसाठी वृणध्दाश्रम चालू करणे व सदर वृध्दाश्रमामध्ये त्यांचेसाठी विरंगुळा केंद्र चालू करणे, व त्यांचे आरोग्य तपासणी शिबीरे राबविणे.

२. मागासवर्गीय भटक्या-विमुक्त जमातीसाठी वसतीगृह, आश्रम शाळा सुरू करणे. तसेच त्यांच्यासाठी प्रशिक्षण केंद्र चालवून त्यांचे विकासासाठी प्रयत्न करणे.

३. शेतीविषयक प्रशिक्षण शाळा स्थापन करणे, शासनाकडील योजना राबविणे, त्याचप्रमाणे शासकीय योजना प्रचार व प्रसार करून शासनाच्या पुर्वपरवानगीने गोर गरीबांसाठी या योजना राबविण्याचा प्रयत्न करणे.

४. गरीब, निराधार, बेवारस, अनाथ अशा व्यक्ती मयत झालेस त्यांचे अंत्यविधीसाठी मदत करणे.

५. लोंकांमध्ये निसर्गाबाबत आवड निर्माण व्हावी म्हणून सहली, इतिहास पदभ्रमंती इत्यांदीचे आयोजन करणे.

६. युवा महोत्सव आयोजित करणे, तसेच आंतरशालेय व आंतर महाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन करणे.

७. गुरु नानक यांचे जन्मदिवस साजरा करणे व त्यांचे विचारांचे प्रचार व प्रसार करणे.

८. आध्यात्मिक साधना केंद्र चालू करणे व रोज विशेष प्रार्थना आयोजित करणे. तसेच कथा किर्तन यांचे आयोजन करणे.

९. गरीब, निराधार, भक्त लोकांना भोजन (लंगर) याची व्यवस्था करणे, जेणेकरुन समाजात सर्व जाती, जमाती व धर्मातील लोकांना एकत्र आणून त्यांच्यात समानता निर्माण व्हावी म्हणून प्रयत्न करणे.

५. शेती –

१. शेती आणि शेतीला पुरक व्यवसायाविषयी शास्त्रज्ञाचे किंवा विषय तज्ञांचे मार्गदर्शन सभासद शेतकरी बंधूंना मिळवून देवून उत्पादनात वाढ घडवून आणणे.

२. अधुनिक शेतीचे तंत्रज्ञान आणि व्यवहार यांचा मेळ घालून कांही नवीन शेती पद्धत अवलंबण्याचे दृष्टीने सभासदाचे अनुभावावरून प्रयत्न करणे व तशी जर नवीन पद्धत विकसित झाली तर तिचा प्रचार आणि प्रसार मंडळाच्या कार्यक्षेत्रात आणि कार्यक्षेत्राच्या बाहेर करणेचे दृष्टीने प्रयत्नशिल राहणे.

३. ग्रामीण भागातील शेतकरी लोकांना शेती विषयक जगातील घडामोडीची कल्पना यावी तसेच त्यांचे ज्ञानात भर पडावी म्हणून वाचनालय सूरू करणे व सदर वाचनालयात शेतीविषयक वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहीके, विशेष विषयावरील पुस्तके, तसेच मनोरंजनात्मक पुस्तके इ. उपलब्ध करणे.

४. लोकांना लागणा-या आवश्यक पुस्तकांचा संग्रह वाचनालयात उपलब्ध करून त्याचा लाभ त्यांना करून देणे.

MISSIONER ★ KOLHAPUR

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

५. पर्यावरण पुरक बांबुची लागवड करुन बांबुचे व पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे.

६. क्रीडा –

१. प्रथमतः जिल्हयातील प्रत्येक गावातील क्रीडा व सांस्कृतिक मंडळ ट्रस्टच्या माध्यमातून एकत्र आणून त्यांना जिल्हा स्तरीय सर्व प्रकारच्या देशी व विदेशी खेळांच्या स्पर्धाच्या कसोटीतून नैसर्गिक गुणांना वाव देणेसाठी उत्स्फूर्त करणे.

२. जिल्हयातील प्रत्येक ग्रामीण भागातील खेळाडूची चाचणी घेवन त्यांचेकडील क्रिडा नैपुण्य पारखणे व त्यांना प्रशिक्षण शिबीरातून याग्य ते प्रशिक्षण देवून जिल्हा तसेच राज्य पातळीवर प्रवेश करून देणेसाठी मदत करणे.

३. जिल्हयातील व राज्यातील प्रत्येक भागात प्रशिक्षण शिबीर तसेच स्पर्धांचे आयोजन करणे. तसेच क्रीडा साहीत्य उपलब्ध करून देणे. तसेच जिल्हयातील प्रत्येक शाळा, कॉलेज यांना विदयार्थ्यांचे क्रीडा गुणांना वाव देणेसाठी प्रशिक्षण तसेच प्रशिक्षण उपलब्ध करून देणे.

४. जिल्हास्तरीय, आंतरशालेय व आंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय तसेच आंतर विद्यापीठ स्पर्धेत भाग घेवून स्वतःची प्रगती करून घेता येईल.

५. तसेच क्रीडांगण,क्रीडासंकुल उभारण्यासाठी प्रती वर्ष तरतुद करून कमी पडणारा निधी ~~हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून~~ गोळा करण्यात येईल.

६. क्रीडा क्षेत्रातील विकासासाठी न्यासाचे कार्यक्षेत्रात ~~प्रशिक्षण केंद्राची निर्मिती करणे.~~

७. क्रीडा क्षेत्रातील सर्वांगीण उन्तीसाठी व विकासासाठी क्रीडा प्रशिक्षकांना, खेळाडूंना मदत करणे, शिष्यवृत्ती देणे व निरनिराळया योजना आखून कार्यक्रम आयोजित करणे.

८. क्रीडा स्पर्धा आयोजित करणे व खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी (सर्वोत्कृष्ट खेळाडूंना) पारितोषिक देणे.

५. **न्यासाचे हिशोबाचे वर्ष –**

या न्यासाचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

६. **न्यासाच्या मिळकतीचा ताबा –**

न्यास नोंदणीच्यावेळी असलेली न्यास निधी १०००/– इतकी रक्कम न्यास निधी म्हणून न्यासाचे नांवे कायम स्वरूपी बँकेमध्ये ठेवण्यात येईल.तसेच यापुढे न्यासाचे खरेदी, संपादित केलेली तसेच देणगी, बक्षीस रूपाने मिळणा-या सर्व मिळकती या न्यासाच्या मालकीच्या मिळकती म्हणून समजण्यात येईल.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

न्यासाचे सर्व स्थावर व जंगम मिळकतीचा ताबा विश्वस्त व्यवस्था पत्रान्वये विश्वस्त मंडळाकडे राहील. या सर्व मिळकतीचा विनियोग न्यासाचे उद्देशावर करणेचा अधिकार विश्वस्त मंडळास राहील.

७. **न्यासाचे विश्वस्त मंडळ व पदाधिकारी यांची रचना –**
या न्यासाचे विश्वस्त मंडळ हे कमीतकमी पाच (५) जणांचे राहील.

८. **प्रथम विश्वस्त मंडळ –**
या न्यासाचे प्रथम विश्वस्त मंडळ हे पाच (५) जणांचे राहील.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.चंदीराम कवडोमल दरडा<br>वय ५४ वर्षे,व्यवसाय – व्यापार,<br>रा.१२०२, गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर | अध्यक्ष/सेटलॉर |
| २. | श्री.बक्षाराम कवडामल दर्डा<br>वय ५७ वर्षे,व्यवसाय– व्यापार<br>रा.सी एस नं.४१३, रेलवे स्टेशन रोड,<br>गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर | उपाध्यक्ष |
| ३. | श्री.संतोष बक्षाराम दर्डा<br>वय ३६ वर्षे,व्यवसाय– व्यापार<br>रा.सी एस नं.४१३, रेलवे स्टेशन रोड,<br>गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर | सेक्रेटरी |
| ४. | श्री.साहिल चंदीराम दरडा<br>वय ३२ वर्षे,व्यवसाय– व्यापार,<br>रा.१२०२, गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर | खजानिस |
| ५. | सौ.आशा चंदीराम दरडा<br>वय ५५ वर्षे, व्यवसाय– व्यापार,<br>रा.१२०२, गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर | विश्वस्त |

सदरचे ट्रस्टचे व्यवस्थापनावर वरील विश्वस्त मंडळ राहील. सेटलॉरनी निवडलेल्या व्यक्ती की ज्यांनी विश्वस्त म्हणून काम करण्याचे मान्य केले आहे व विश्वस्त व्यवस्थापत्रावर ट्रस्ट डिडवर सहया केल्या आहे व त्यांच्याकडे सदर ट्रस्टच्या स्थावर व जंगम मालमत्तेचा ताबा देण्यात आला आहे, त्यांची ट्रस्टच्या स्थावर व जंगम मिळकतीवर देखरेख राहील.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

९. **विश्वस्त मंडळाचा व रिक्त पद भरणेची तरतुद –**

या न्यासाचे विश्वस्त मंडळ कमीत कमी पाच (५) जणांचे राहिल. यातील विश्वस्त नं.१ ते ५ हे तहहयात राहतील, यांची जागा काही कारणाने रिकामी झालेस सदरची जागा ही त्याच्या वारसामधूनच घेणेची आहे.

१०. **खालीलपैकी कोणत्याही कारणाने विश्वस्त मंडळातील विश्वस्तास कमी करण्याचा अधिकार राहील.**

१. निधन झालेस.

२. वेड लागले अगर न्यायालयाने नादार अगर अन्य दोषी ठरविलेस.

३. शारिरीक दुर्बलता अगर वार्धक्य किंवा कोणत्याही कारणाने विश्वस्त म्हणून काम करणेस असमर्थ झालेस अगर ठरलेस.

४. राजीनामा दिलेस.

५. विश्वस्त मंडळाची पूर्व परवाणगी न घेता भारताबाहेर स्थायिक झालेस अगर स्वेच्छेने निघून गेलेस.

६. विश्वस्त निधीच्या नियम, पोटनियम व विश्वस्त मंडळाच्या हितास विघातक कार्य केलेस अशा विश्वस्तास विश्वस्त मंडळ त्यास विश्वस्ताच्या पदावरून कमी करू शकतील.

७. विश्वस्त मंडळावरील विश्वस्तांची संख्या कमीतकमी पाच (५) राहील.

८. कोणत्याही कारणाने रिकामी होणारी जागा बहुमताने भरण्याचा अधिकार चिफ ट्रस्टी/अध्यक्ष यांना राहील.

११. **विश्वस्त पद रिक्त होणेबाबत –**

१. राजीनामा दिल्यास, मृत्यु पावल्यास अगर मानसिक दृष्टया काम करणेस अपात्र ठरल्यास.

२. फौजदारी व नैतिक अध:पतनाच्या गुन्हयाखाली शिक्षा झाल्यास .

३. न्यासाच्या हिताविरूद्ध कोंणतेही कृत्य केल्यास अगर न्यासविषयी बदनामी केल्यास विश्वस्त मंडळाच्या सभेत बहुमताने विश्वस्त पद कमी करणेत येईल.

४. मे. धर्मादाय उप आयुक्त, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्या पूर्व परवानगीशिवाय भारताबाहेर स्थायिक झालेस.

१२. **विश्वस्त मंडळातील पदाधिकारी व विश्वस्तांची कामे –**

विश्वस्त निधी (ट्रस्ट) चे मुख्य विश्वस्त हे व्यवस्थापनाच्या सोईसाठी चिफ ट्रस्टी / अध्यक्ष म्हणून राहणेचे असून त्यांना ट्रस्टच्या व्यवस्थापनासाठी यदाकदाचित जरूर वाटल्यास इतर विश्वस्तांच्या अनुमतीने ट्रस्टच्या विश्वस्तांमधून ट्रस्टचे पदाधिकारी (उदा.

Scanned with CamScanner

अध्यक्ष,उपाध्यक्ष, सेक्रेटरी, खजानिस) यांची नियुक्ती करणेची असून त्यांना पदाप्रमाणे काणे पुढील असतील.

अ) अध्यक्ष -

१. संस्थेच्या अध्यक्षांनी संस्थेच्या सभांचे अध्यक्षस्थान भुषवावे व नियंत्रण करावे.
२. संस्थेच्या सर्व सभांचे कामकाज नियम व नियमावली नुसार संस्थाहितार्थ चालवावे.
३. संस्थेच्या कारभारावर व त्यांच्या विविध शाखांवर नियंत्रण ठेवावे.
४. संस्थेच्यावतीने रक्कमेची देवाण-घेवाण करणे.
५. संस्थाहितार्थ विविध करार करणे.
६. सभासदांचा राजीनामा मंजूर करणे बाबत अंतिम अधिकार अध्यक्षांना राहील.
७. मतांची बरोबरी झाल्यास जास्तीचे मत/निर्णायक मत देण्याचा अधिकार अध्यक्षांनी बजवावा.
८. संस्था हितार्थ सर्व अंतीम अधिकार अध्यक्षांना असतील.

ब) उपाध्यक्ष -

१. संस्थेच्या अध्यक्षांच्या आदेशाचे पालन उपाध्यक्षांनी करावे.
२. संस्थेच्या कार्यात अध्यक्षांना मदत करणे.
३. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत/गैरहजेरीत अध्यक्षांना असलेले सर्वाधिकार वापरुन संस्थाहितार्थ संस्थेचे कामकाज चालवावे.
४. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत/गैरहजेरीत संस्थेच्या सभांचे अध्यक्षस्थान भुषवावे व नियंत्रण करावे.

क) सचिव/सेक्रेटरी -

१. सचिव/सेक्रेटरी यांनी अध्यक्षांच्या आदेशांचे पालन करावे.
२. संस्थेच्या सर्व सभा आयोजित करणे, तसेच प्रत्येक सभेचे इतिवृत्त, कार्यवृत्त हे इतिवृत्तनोंदवही मध्ये सुवाच्च अक्षरात सुस्पष्ट लिहावे. व पुढील सभेत वाचून दाखवावे.
३. संस्थेच्या नांवे सर्व अधिकृत पत्रव्यवहार करावा.
४. विविध कार्यसुची तयार करावी.
५. संस्थेचे कर्मचारी म्हणुन विविध पदांवर नेमणुका करणे, नोकरीतुन काढून टाकणे, संस्थेच्या कर्मचाऱ्यांसाठी नियम तयार करावेत, त्यांचेवर लक्ष ठेवणे.
६. संस्थेचे कोर्ट कचेरीचे कामकाज पाहणे.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

७. संस्थेच्यावतीने रक्कमेची देवाण-घेवाण करणे, आवश्यकतेनुसार अध्यक्षांच्या लेखी परवनगीने संस्थेचे रु.१०००/- पर्यंतची रक्कम आकस्मीक खर्चासाठी आपल्या हाती ठेवावी.
८. वार्षिक हिशोब पत्रके व इतर महत्वाची विवरणपत्रके, महत्वाचे अहवाल वेळोवेळी तयार करवून घेणे व संबंधीत विभागांकडे विहीत वेळेत सादर करणे.
९. कार्यकारी मंडळाचे संमतीने किरकोळ नियम तयार करणे.
१०. संस्थेच्या मोठ्या खर्चाची बिले मंजुर करणे, मालमत्तेची देखरेख करणे.
११. संस्थेच्या अर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे.
१२. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या अनुपस्थितीत संस्थेच्या सभांचे अध्यक्षपद स्विकारुन संस्था हितार्थ कामकाज चालविणे.

ड) खजिनदार -

१. खजिनदार यांनी अध्यक्षांच्या आदेशांचे पालन करावे.
२. वार्षिक हिशोब पत्रके व इतर महत्वाची विवरणपत्रके तयार करणे व संबंधीत विभागांकडे विहीत वेळेत सादर करणे.
३. संस्थेच्या खर्चाची बिले मंजूर करणे, पावत्यांवर सह्या करणे, मालमत्तेची देखरेख करणे, मोठ्या खर्चाची बिले सचिवांच्या संयुक्त सहीने मंजूर करणे, संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे.
४. संस्थेच्या जमा खर्चाचे हिशोब ठेवणे व त्यासंबंधीच्या नोंदवह्या सुस्थितीत ठेवणे.
५. संस्थेच्या नांवे जमा झालेल्या रक्कमेपैकी जास्तीत जास्त रक्कम त्याच दिवशी सायंकाळ पर्यंत अथवा दुसरे दिवशी सकाळी संस्थेच्या नांवे असलेल्या बँक खात्यात जमा करावी.
६. खजिनदाराने सभासदांची सुची तयार करुन त्यांचे वर्गणीचा हिशोब व्यवस्थित व अद्यायावत ठेवावा.
७. संस्थेच्या नांवे वेळोवेळी येणाऱ्या कोणत्याही रक्कमा, वर्गणी, देणग्या, प्रवेश शुल्क, निधी, चिजवस्तु वगैरे स्विकाराव्यात आणि त्याबाबत छापिल अनुक्रमांकीत, संस्थेचा नोंदणी क्रमांक व कार्यालयाचा पत्ता असलेल्या पावत्या द्याव्यात.
८. लेखापरिक्षकांनी काढलेल्या त्रुटींची त्वरित पुर्तता करणे.

इ) कार्यकारी सदस्य -

१. सर्व कार्यकारी सदस्यांनी अध्यक्षांच्या आदेशांचे पालन करावे, व सचिवांना त्यांचे कार्यात परवानगी नुसार आवश्यकतेप्रमाणे मदत करावी.
२. सर्व सभांमध्ये उपस्थित राहणे.
३. संस्थेच्या कामकाजावर लक्ष ठेवणे.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

४. निवडणुकीस मतदान करणे.
५. संस्थेस सुयोग्य निर्णय घेण्यास/ योग्य निर्णय पारित करण्यांस मदत करणे.
६. संस्थेचे नांव, कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहचविणे कामी सर्वकामे करणे.

१३. विश्वस्त मंडळाच्या सभेची सुचना -

विश्वस्त मंडळाच्या प्रत्येक सभेची सुचना (नोटीस) चिफ ट्रस्टी / अध्यक्षांच्या सहीने काढण्यात येईल. सभेची सुचना कमीतकमी ५ (पाच) दिवस अगोदर विश्वस्त मंडळातील विश्वस्तांना त्यांचे अधिकृत पत्यावर पोस्टाने किंवा हस्तपोहोच घेवून दिली पाहिजे.यदर नोटीसीमध्ये सभेची तारीख,ठिकाण,वेळ व विषय यांचा समावेश राहील. पोस्टाने सभेची सुचना पाठविताना ती अंडर सर्टिफिक्रेट ऑफ पास्टीगनेपाठविली पाहीजे. पोस्टाच्या चुकीमुळे एखादया विश्वस्तास सभेची नोटीस मिळाली नाही जर अगर उशिरा मिळाली तर त्या सभेचे कामकाज बेकायदेशिर हाणार नाही. प्रत्येक विश्वस्ताने आपला अद्यावत पत्ता न्यासाच्या कार्यालयात नोंदविला पाहिजे.

१४. विश्वस्त मंडळाची सभा -

विश्वस्त मंडळाची सभा किमान तीन महिन्यातून एकावेळा तरी बोलावली पाहिजे. अशा सभेला सामान्य सभा असे संबोधले जाईल.आवश्यकता भासल्यास जादा सभा बोलविण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास राहील.तसेच विश्वस्त मंडळातील किमान ३ विश्वस्तांनी चिफ ट्रस्टी / अध्यक्षांकडे विनंती करून ज्या कारणासाठी सभा बोलवावयाची आहे ते लेखी स्पष्ट करून विनंती केली तर अशी सभा चिफ ट्रस्टी/अध्यक्षांनी बोलवावी. अशा सभेस मागणी सभा असे संबोधले येईल.

१५. गणसंख्या -

विश्वस्त मंडळातील विश्वस्तांची गणसंख्या तीन पंचमांश राहील.

१६. तहकुब सभा -

विश्वस्त मंडळाच्या सभेची वेळ ठरविलेपासून अर्धा तासाच्या आत सभेची गणपूर्ती (कोरम) झाली नाही तर ती सभा तहकुब होईल. त्यानंतर अर्ध्या तासाने ती सभा त्याच ठिकाणी भरेल व अशा सभेस गणपूर्तीची अट असणार नाही. मात्र अशा नोटीसीमध्ये तशी सुचना लिहीणे विषयाखेरीज इतर कामकाज होणार नाही.

१७. बहुमताने ठराव मंजुरी -

विश्वस्त मंडळाच्या सभेत सादर करण्यात येणारा प्रत्येक विषय किंवा ठराव सभेत हजर असणा-या विश्वस्तांच्या बहुमताने मंजुर काण्यात येईल. प्रत्येक विश्वस्तास एका वेळी एकच मत देण्याचा अधिकार राहील. परंतु मतदानाच्या वेळी सम-समान मत

COMMISSIONER
उप आयुक्त
KOLHAPUR

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

विभागणी झाल्यास त्या सभेच्या अध्यक्षांना एक जादा निर्णायक मत देण्याचा अधिकार राहील.विश्वस्त मंडळाने केलेला कोणताही ठराव त्यांना आवश्यकतेनुसार रद्द करता येईल.

१८. परिपत्रकाची सभा –

एखादया अत्यंत तातडीच्या विषयावर विश्वस्त मंडळाची सभा न घेता परिपत्रकान्वये निर्णय विश्वस्त मंडळास घेता येईल. मात्र तो निर्णय एकमताने संमत झाला पाहिजे. जर परिपत्रकातील निर्णयावर एकमत झाले नाही तर तो विश्वस्त मंडळाच्या पुढील सभेत ठेवला जावून त्यावर निर्णय घेता येईल.

१९. सभा वृत्तांत वही –

१. विश्वस्त मंडळाच्या प्रत्येक सभेचा वृत्तांत लिहीण्यासाठी एक सभा वृत्तांत वही ठेवण्यात येईल. त्यात खालील बाबींचा समावेश राहील.

अ) विश्वस्त मंडळाच्या सभा बोलविण्यासंबधी दिलेल्या लेखी सुचनांची (नाटीसीची) नोंद.

ब) विश्वस्त मंडळाच्या प्रत्येक सभेचा समग्र व यथार्थ वृत्तांत.

क) प्रत्येक परिपत्रकावर व विषयावर विश्वस्त मंडळाने घेतलेला निर्णय.

२. प्रत्येक सभेचा वृत्तांत त्यानंतर लगेच भरणा–या पुढील विश्वस्त मंडळाच्या सभेत वाचून दाखविला जाईल आणि तो सर्वानुमते मंजुर झाल्यास त्यावर सभेचे चिफ ट्रस्टी / अध्यक्ष तो वृत्तांत मंजुर झाल्याची नोंद म्हणुन आपली स्वाक्षरी करतील.

२०. न्यासाच्या स्थावर व जंगम मिळकतीची नोंद वही –

स्थावर व जंगम मिळकतीची नोंद वही,मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवथा अधिनियमातील तरतुदी प्रमाणे विहीत नमुण्यात ठेवण्यात येईल. तसेच या नोंदणीतील मालमत्तेत होणारी वाढ अगर घट सविर व जंगम मिळकत नोंदवहीमध्ये दरवर्षी नोंदवून घेवुन वर्षातून एकदा तिची रूजवात घेण्यात येईल.स्थावर व जंगम मिळकतीच्या बदलाचा बदल अर्ज मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील कलम २२ अन्वये मा. धर्मादाय उप आयुक्त,कोल्हापूर यांना वेळेत व विहीत नमुन्यात विश्वस्त मंडळाने सादर करणे बंधनकारक आहे.

२१. स्थावर मालमत्ता खरेदी – विक्री करण्याबाबतची तरतुद :–

संस्थेच्या हितासाठी, उद्देशपूर्तीसाठी स्थावर मालमत्तेची खरेदी–विक्री करता येईल. सर्वसाधारण सभेमध्ये या बाबतचा ठराव बहुमताने पारीत करुन त्याबाबत व्यवहार करता येईल. मात्र या बाबत मा.धर्मादाय सह आयुक्त यांची कायद्याप्रमाणे पुर्वपरवानगी आवश्यक राहील.

COMMISSIONER आयुक्त KOLHAPUR कोल्हापूर

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

२२. न्यासाच्या स्थावर मिळकतीची डागडुजी –

विश्वस्त मंडळाने न्यासाच्या सर्व स्थावर मिळकती सुव्यवस्थित ठेवणे आवश्यक आहे. वेळोवेळी जरूर ती दुरूस्त व डागडुजी विश्वस्त मंडळाने करणे आवश्यक आहे. न्यासाच्या मालकीचे इमारतीचे व स्थावर व जंगम मिळकतीचे आग अगर तत्सम बाबीपासून संरक्षण करण्यासाठी विश्वस्त मंडळाने सर्व मिळकतीचा विमा उतरवावा. कोणत्याही स्थावर मिळकतीच्या दुरूस्तीसाठी किंवा मोबदल्यासाठी (टेंडर) विश्वस्त मंडळाने मागविणे बंधनकारक राहील. परंतु अशा प्रकारचे काम जर विश्वस्त मंडळ स्व:ताच्या देखरेखीखाली करणार असेल तर त्यासाठी निविदा मागविणेची आवश्यकता नाही.

२३. न्यासाचा निधी व मिळकत –

न्यासासाठी खालील मार्गाने निधी गोळा करण्यात येईल.

(१) देणगी,(२) ठेव व्याज,(३)न्यासाच्या स्थावर व जंगम मिळकतीचे भाडे,(४) सांस्कृतिक कार्यक्रम साजरे करून मिळणारे उत्पन्न,(५) शासकिय, निमशासकिय व मध्यवर्ती शासनाचे अनुदान,(६) विश्वस्त मंडळास अन्य कायदेशिर मार्गाने निधी गोळा करता येईल. तसेच विश्वस्त मंडळास मान्य असलेल्या अटीवर मदत स्विकारता येईल.

न्यासाच्या उद्‌देशांना अनुसरून विशिष्ट कारणासाठी वेगवेगळया प्रकारचे निधी उभारता येतील. मात्र अशा पावत्या देणगीदारांना दिल्या पाहिजेत. ज्या कारणासाठी निधी गोळा करण्यात येईल त्या कारणासाठीच सदरचा निधी वापरावा लागेल.

२४. निधीची गुंतवणुक –

उद्‌देशावर खर्च करून जादा निधी शिल्लक राहिल्यास त्या निधीची गुंतवणुक मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३५ मधील तरतुदीनुसार करण्यात येईल.

२५. हिशोब –

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतुदी प्रमाणे न्यासाचे उत्पन्न आणि खर्चाचे हिशोब विश्वस्त मंडळ नियमितपणे ठेवतील. व ते हिशोब वरील अधिनियमातील तरतुदीनुसार सनदी लेखापालाकडून तपासून घेवून विहीत नमुन्यांतील हिशोब पत्रके मा.धर्मादाय उप आयुक्त, कोल्हापूर यांचेकडे विहित वेळेत व विहति नमुन्यात सादर करणेची जबाबदारी मंडळाची राहील.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

२६. कर्ज किंवा ठेवी या बाबतचे अधिकार -

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतुदीनुसार कलम ३५ व कलम ३६ प्रमाणे मा. धर्मादाय सह आयुक्त, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे पूर्व परवाणगीने न्यासाला ठेवी व कर्ज घेता येईल व मिळकत विक्री करता येईल.

२७. करार -

उदिष्टपूर्तीसाठी विश्वस्त मंडळ न्यासासाठी स्थावर व जंगम मिळकत खरेदी, भाडयाने, भाडेपटयाने, देणगीने अक्वा अन्य कायदेशिर प्रकाराने घेवू - देवू शकेल. अशा प्रकारे घ्यावयाच्या अगर दयावयाच्या मिळकतीची किंमत / भाडयाची रक्कम ठरविणेचा अधिकार विश्वस्त मंडळास राहील.

२८. नियम -

न्यासामार्फत राबविल्या जाणा-या विविध शाखाबाबत नियम करणेचा अधिकार विश्वस्त मंडळाला राहील. तथापि ते नियम न्यास विलेखातील (ट्रस्ट डिडमधील) तरतुदीची व प्रचलित कायदयाशी विसंगत असता कामा नयेत.

२९. बँक खाते -

न्यासाकडील शिल्लक रक्कम न्यासाचे नसवे उघडण्यात यावयाच्या खात्यात शेडयुल किंवा शासन मान्यताप्राप्त सहकारी किंवा राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्यात येईल. शिल्लक असलेली रक्कम कोणाही खाजगी व्यक्ती वा संस्थेकडे ठेवू नये.

न्यासाचे बँकेतील अर्थिक व्यवहार चिफ ट्रस्टी / अध्यक्ष यांच्या एका सहीने बँकेचे अर्थिक व्यवहार करणेचे असून या सहयामध्ये चिफ ट्रस्टी / अध्यक्ष यांची सहीच असणे जरूरी आहे.

३०. विश्वस्त व्यवस्था पत्रातील तरतुदीमध्ये बदल -

या विश्वस्त व्यवस्था पत्रातील ट्रस्ट डिडमधील कांही नियम, उद्देश, नांव अथवा अन्य कांही बदल कावयाचा असेल तर अशा बदल करणेसाठी चिफ ट्रस्टी / अध्यक्ष त्या विषयावर सभा बोलावतील व तशा विषयाचे नमूद तशी नाटीस नियमाप्रमाणे विश्वस्त मंडळाच्या प्रत्येक विश्वस्तास देणेत येईल. विश्वस्त मंडळाच्या सभेत एकमताने तो बदल मंजुर करणेत येईल. मात्र अशा बदलास मा. धर्मादाय सह आयुक्तांची, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कायदयानुसार व इतर कायदे कानूला अधिन राहून सक्षम अधिका-यांच्या आणि सक्षम न्यायालयाच्या पूर्व परवानगीने विश्वस्त व्यवस्थापत्रामध्ये (ट्रस्ट डिड) मध्ये बदल करण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास राहील.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

३१) न्यासाच्या अपरिहार्यतेबाबत :-

सदरच्या न्यास कोणाही एका व्यक्तीस रद्द करता येणार नाही. न्यासाच्या मालमत्तेचा तावा, नियंत्रण कोणाही एका व्यक्तीकडे राहणार नसल्याने सदरची न्यास ही अपरिहार्य न्यास असणार आहे.

३२) लाभार्थी :-

न्यास निधी हा कोणाही व्यक्तीसापेक्ष नसून समाजसापेक्ष असणे आवश्यक आहे. न्यासाचे लाभार्थी समाजाचा भाग राहील. कोणत्याही परिस्थितीत न्यासाचे लाभार्थी हा वैयक्तिक स्वरुपात असणार नाही.

३३) विसर्जन :-

जर काही कारणांमुळे संस्था बरखास्त करावयाची झाली तर वरील प्रमाणे सर्व सभासदांना १० दिवस अगोदर नोटीस देऊन कळविण्यांत येईल. याबाबत सुध्दा सर्व साधारण सभे मध्ये संस्थेच्या एकूण सभासद संख्येच्या ३/५ गणसंख्येने तसा ठराव संमत करावा लागेल. संस्थेचे सर्व देणे-घेणे आर्थिक व्यवहार पूर्ण करावे लागतील संस्थेची स्थावर-जंगम, शिल्लक मालमत्ता नोंदणीकृत संस्थेस दान/देणगी म्हणुन दिली जाऊ शकते तसेच संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या कलम १३ व १४ नुसार कार्यवाही पुर्ण करावी लागेल.

---

वरीलप्रमाणे १ ते ३० प्रमाणे तरतुदी करून, राजीखुषीने व अक्कल हुषारीने "दरबार बाबा नानक चॅरिटेबल ट्रस्ट, गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर" या ट्रस्टचे ट्रस्ट डिड (विश्वस्त व्यवस्थापत्र) आज दि.०२/०९/२०२२ इ. रोजी कोल्हापूर येथे करण्यात आले आहे.

श्री.चंदीराम कवडोमल दरडा
सेटलॉर चिफ/ ट्रस्टी

१) सही/-
नांव - अशोक रघुनाथ कोळी
पत्ता - चिंचवाड (कोल्हापूर)
२) सही/-
नांव - श्याम मोहनलाल आहूजा
पत्ता - गांधीनगर (कोल्हापूर)

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

आम्ही खालील सहया करणार या विश्वस्त व्यवस्थापत्रातील (ट्रस्ट डिड) तरतुदीप्रमाणे नियुक्ती करण्यात आलेले प्रथम विश्वस्त मंडळाचे विश्वस्त जाहीर करतो की, "दरबार बाबा नानक चॅरिटेबल ट्रस्ट, गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर" या न्यासाच्या विश्वस्त व्यवस्था पत्रातील सर्व उद्देश, नियम व अटी आम्ही वाचल्या असून या आम्हास मान्य व कबूल आहेत. या न्यास व्यवस्था पत्रातील रू.१०००/- (अक्षरी रूपये हजार फक्त) चा आम्ही स्विकार केलेला असून या न्यासाच्या प्रथम विश्वस्त मंडळास विश्वस्त म्हणून काम करणेस आमची संमती आहे.

| अ.नं. | विश्वस्तांचे नांव | सही |
|---|---|---|
| १. | श्री.चंदीराम कवडोमल दरडा | --[signature] |
| २. | श्री.बक्षाराम कवडामल दर्डा | --[signature] |
| ३. | श्री.संतोष बक्षाराम दर्डा | -- [signature] |
| ४. | श्री.साहिल चंदीराम दरडा | --[signature] |
| ५. | सौ.आशा चंदीराम दरडा | A. C. Darda |

१) सही/- [signature]
नांव - अमोल रघुनाथ कोळी
पत्ता - कि-५४१५ (कोल्हापूर)
२) सही/- Satish
नांव - सतीश अशोककुमार शिरवानी
पत्ता - गांधीनगर (कोल्हापूर)

DEPUTY CHARITY COMMISSIONER धर्मादाय उप आयुक्त KOLHAPUR REGION कोल्हापूर विभाग कोल्हापूर

[signature] 26/10/2023

Prepared & compared by :

प्रमाणित सत्य प्रत [signature] 26/10/2023
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner